**Reliance**
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: +९१–२२–३५५५ ५०००, फॅक्स: +९१–२२–२२०४ २२६८ • ई–मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# कंपनीच्या सदस्यांसाठी सूचना

कंपनीच्या सदस्यांना ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, शुक्रवार, १७ सप्टेंबर, २०२१ रोजी म्हणजे अंतिम मुदतीच्या तारखेला ज्यांचे ई–मेल अ‍ॅड्रेस कंपनी/केफिन टेक्नॉलॉजीज् प्रायव्हेट लिमिटेड (''केफिनटेक''), कंपनीचे रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण एजंट/डिपॉझिटरी सहभागी यांचेकडे नोंदविले आहेत अशा सदस्यांना पोस्टल मतपत्रिकेच्या सूचनेत नमूद करण्यात आलेल्या ठरावावर सदस्यांची संमती मिळविण्यासाठी, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पोस्टल मतपत्रिकेची सूचना पाठविण्यात आली आहे. कंपनीने रविवार, १९ सप्टेंबर, २०२१ रोजी पोस्टल मतपत्रिकेची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.

कंपनीच्या वेबसाईटवर www.ril.com येथे आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटसवर म्हणजे बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या वेबसाईटसवर अनुक्रमे www.bseindia.com येथे आणि www.nseindia.com येथे आणि केफिनटेक यांच्या वेबसाईटवर https://evoting.kfintech.com येथे पोस्टल मतपत्रिकेची सूचना उपलब्ध आहे. ज्या सदस्यांना पोस्टल मतपत्रिकेची सूचना मिळाली नाही अशा सदस्यांनी ती वर नमूद करण्यात आलेल्या वेबसाईटसवरून डाऊनलोड करावी.

पोस्टल मतपत्रिकेच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तपासणीसाठी उपलब्ध आहेत आणि ज्या सदस्यांना सदर दस्तऐवज तपासायचे आहेत ते investor.relations@ril.com येथे ई–मेल पाठवू शकतात.

**ई–मतदानासंबंधी सूचना:**

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या लागू परिपत्रकांनुसार, कंपनी आपल्या सदस्यांना पोस्टल मतपत्रिकेच्या सूचनेत नमूद केलेल्या प्रस्तावित ठरावावर मतदान करण्याचा त्यांचा अधिकार बजावण्यासाठी फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची **(''ई–मतदान'')** सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्यांच्या सहमती किंवा असहमतीचा संवाद फक्त दूरस्थ ई–मतदान प्रक्रियेद्वारे होईल. कंपनीने ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केफिनटेक यांची सेवा घेतली आहे. सदस्य खाली नमूद केलेल्या कालावधीत आपले मतदान करू शकतात:

| | | |
|---|---|---|
| **ई–मतदान सुरू होण्याची वेळ** | : | **सोमवार, २० सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ९:०० वाजता (भाप्रवेळ)** |
| **ई–मतदान संपण्याची वेळ** | : | **मंगळवार, १९ ऑक्टोबर, २०२१ रोजी सायंकाळी ५:०० वाजता (भाप्रवेळ)** |

वरील तारीख व वेळेनंतर ई–मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि त्यानंतर केफिनटेक द्वारा वरील कालावधी संपल्यानंतर ई–मतदान सुविधा अकार्यान्वित करण्यात येईल.

डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात, छापील स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांसाठी आणि ज्यांनी त्यांचे ई–मेल अ‍ॅड्रेस नोंदविले नाहीत अशा सदस्यांसाठी ई–मतदान करण्याच्या पद्धतीची माहिती पोस्टल मतपत्रिकेच्या सूचनेत देण्यात आली आहे. एखादी व्यक्ती युजर आयडी आणि पासवर्ड विसरल्यास, ती व्यक्ती कशा पद्धतीने ती मिळवू शकेल/तयार करू शकेल याची माहिती देखील सदर सूचनेत देण्यात आली आहे.

**अंतिम मुदतीच्या तारखेला ज्याचे नाव सदस्यांच्या रजिस्टरमध्ये/लाभधारक मालकांच्या यादीत आहे अशी व्यक्तीच फक्त ई–मतदानासाठी पात्र समजण्यात येईल.** सदस्याचे/लाभधारक मालकाचे मतदानाचे अधिकार (इलेक्ट्रॉनिक भागधारणेच्या बाबतीत), अंतिम मुदतीच्या तारखेला त्याच्या/तिच्या/त्यांच्या कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी समभाग भांडवलातील हिस्यानुसार असतील. **अंतिम मुदतीच्या तारखेनंतर कंपनीची सदस्य बनलेल्या व्यक्तीने ही सूचना फक्त माहितीसाठी आहे असे समजावे.**

**ई–मेल अ‍ॅड्रेसची नोंदणी/सुधारणा करण्याची पद्धती:**

ए) छापील स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी कंपनीपाशी त्यांचा ई–मेल अ‍ॅड्रेस नोंदविलेला नाही/त्यात सुधारणा केलेली नाही असे सदस्य, **https://rkarisma.kfintech.com/shareholders** येथे क्लिक करून, किंवा फोलिओ क्रमांक, ई–मेल अ‍ॅड्रेस आणि पॅनकार्डाची स्वयंप्रमाणित प्रत केफिनटेक यांना **rilinvestor@kfintech.com** येथे पाठवून त्याची नोंदणी करू शकतात/त्यात सुधारणा करू शकतात.

बी) डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी त्यांचा ई–मेल अ‍ॅड्रेस नोंदविलेला नाही/त्यात सुधारणा केलेली नाही असे सदस्य, त्यांचे खाते ज्यांच्यापाशी आहे अशा डिपॉझिटरी सहभागी यांचेकडे त्यांच्या ई–मेल अ‍ॅड्रेसची नोंदणी करू शकतात/त्यात सुधारणा करू शकतात.

सदर ठराव मंजूर झाल्यास, तो ई–मतदानाच्या शेवटच्या तारखेला म्हणजेच १९ ऑक्टोबर, २०२१ रोजी मंजूर झाल्याचे मानले जाईल. ई–मतदानाचे निकाल गुरूवार, २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी किंवा त्यापुर्वी जाहीर करण्यात येतील आणि ते कंपनीच्या वेबसाईटवर www.ril.com येथे प्रदर्शित करण्यात येतील व स्टॉक एक्सचेंजेस आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड व सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड व केफिनटेक यांना कळविण्यात येतील. कंपनी आपल्या नोंदणीकृत कार्यालयात देखील सदर पोस्टल मतपत्रिकेचे निकाल प्रदर्शित करेल.

ई–मतदानासंबंधी काही प्रश्न असल्यास सदस्यांनी केफिनटेकची वेबसाईट **https://evoting.kfintech.com** येथे ई–मतदानासाठी उपलब्ध असलेल्या ''डाऊनलोडस्'' भागातील ड्रॉपडाऊन मेनूत उपलब्ध असलेला ''हेल्प'' आणि ''एफएक्यूज'' विभाग / ई–मतदान वापरण्याविषयी माहिती पुस्तिक पहावे.

ई–मतदानासंबंधी प्रश्न/तक्रारी, काही असल्यास, संपर्काचा तपशील:

श्री. एस्. पी. वेणुगोपाल, उपाध्यक्ष/श्री. एस्. शिवा शंकर बाबू, वरिष्ठ व्यवस्थापक
केफिन टेक्नॉलॉजीज् प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचिबोवली,
नामाक्रमगुडा, हैदराबाद – ५०००३२, दूरध्वनी क्र.: +९१ ४० ६७१६ १७००,
ई–मेल: **evoting.ril@kfintech.com**

टोल–फ्री क्रमांक: १८००–३०९–८९९८/१८००–३०९–४००१ (सर्व कामकाजांचे दिवशी, सकाळी ९:०० भाप्रवेळ ते सायंकाळी ६:०० भाप्रवेळ)

संचालक मंडळाच्या आदेशाने
सही/–
के. सेथूरामन
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कम्प्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : २० सप्टेंबर, २०२१

www.ril.com